# मराठी विभाग अहवाल

शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये मराठी विभागाने उच्चशिक्षण व विदयार्थ्यांना भाषा शिक्षणाचे महत्त्व पटवून दिले. नियमित व्याख्याने, क्षेत्रभेट आणि परस्पर संबधी सहज सुलभ अध्यापन पद्धतीचा अवलंब करून मराठी विभागाचा शैक्षणिक निकाल वाढविण्यात आलाः

शैक्षणिक वर्षे २०२४-२५ मध्ये नूतन कला महाविदयालया -तील मराठी विभागात प्रा. चव्हाण जे बी व प्रा. वाकचौरे एस. बी (नॅक समन्वयक) म्हणून काम करत आहेत. मराठी विभागात प्रथम वर्ष कला ५५ विदयार्थी, द्वितीय वर्ष मराठी विशेषस्तर १३ विदयार्थी आहेत. तृतीय वर्ष मराठी विभागात ५ विदयार्थी आहेत. तर वाणिज्य विभागात प्रथम वर्ष - २६ विदयार्थी प्रथम वर्ष विज्ञान - २३ विदयार्थी व द्वितीय वर्षे विज्ञान -३५ विदयार्थी होते.

दुसऱ्या सत्रात महाविदयालयात मराठी राजभाषा दिन उत्साहात साजरा करण्यात आला. त्याचबरोबर विदयार्थ्यांसाठी कोफण येथे क्षेत्रभेटीचे आयोजन केले. या क्षेत्रभेटीत विदयार्थ्यांनी कोकणी भाषेबद्दल माहिती मिळवली. व प्रा. वाकचौरे एस बी यांनी सहकार महर्षी भाऊसाहेब संतूजी थोरात महाविदयालय संगमनेर येथे राष्ट्रीय स्तरावर पेपर प्रकाशित व सादरीकरण केले. व खघड या विषयाच्या कार्यशाळेमध्ये सक्रिय सहभाग नोंदवला. ग रमेश फिरोदिया महाविदयालय साकूर येथे बहिस्थ पर्यवेक्षक म्हणून कामकाज पाहिले. एकंदरीत शैक्षणिक वर्ष २०२४-२०२५ मध्ये मराठी विभागातील कामकाज उत्साहात पार पाडीत वर्षाची सांगता झाली.

प्रा.चव्हाण जयश्री

विभाग प्रमुख